पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

**दिनांक – १२/०७/२०१९** **वेळ - सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१२/०७/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.राजू मिसाळ
६. मा.नढे विनोद जयवंत
७. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.चव्हाण – कार्यकारी अभियंता, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) मनपा कडून आर्थिक सहाय्य अदा करणेबाबत - मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मनपा कडून आर्थिक सहाय्य अदा करणेबाबत – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मनपा कडून आर्थिक सहाय्य अदा करणेबाबत - मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) महापौरचषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेबाबत.

विषय क्र.७) खराळवाडी येथील मनपाची व्यायाम शाळा गिता महिला बचत गट चालविण्यास देणेबाबत - मा.विकास गवळी, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २२/०३/२०१९,१२/०४/२०१९,२६/४/२०१९, व २८/६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.२१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक २८/६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिकाक्र.०२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ८ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १२/०७/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६४४/२०१८, दि.३१/१२/२०१८

विषय – मे.सुमित स्पोर्टस ऍन्ड फिटनेस इक्विपमेंटस,चिंचवड,पुणे-१९ यांना भोसरी जलतरण तलाव, पाणी शुध्दीकरण,परिसर स्वच्छता,देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामकाज मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १२/०७/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२८६/२०१९ दि.२९/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व महाराष्ट्र राज्य रोलबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने सन २०१९-२० मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटिंग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,९७,२०८/- (अक्षरी र.रु.सहा लाख सत्याण्णव हजार दोनशे आठ फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.६,९७,२०८/- मधील स्टेज मागे पडदा, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था अनुषंगाने करावयाचा खर्च एकूण र.रु.१,२२,६००/- हा स्थापत्य विषयक खर्च, स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.५०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.५,२४,६०८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक – ०३

दिनांक – १२/०७/२०१९

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव -

कु.नम्रता सुनिल तायडे, रा.वंदना निवास, गल्ली नं.४, स्पाईन रोड शरदनगर, चिखली, पुणे १४ या खेळाडूची तायक्वांदो या खेळामध्ये ६८ वजनी गटामध्ये १० वी एशियन ज्युनिअर क्युरुगी आणि ५ वी एशियन ज्युनिअर पुमसे तायक्वान्दो चॅम्पियनशीप २०१९ अमान, जॉर्डन येथे दि.१९ ते २२ जुलै २०१९ या दरम्यान होणार आहे. या स्पर्धेत कु.नम्रता सुनिल तायडे हिची निवड झालेली आहे. या

अनुषंगाने कु.नम्रता सुनिल तायडे हिस मनपाच्या क्रीडा धोरणांनुसार र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १२/०७/२०१९

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव -

कु.जीवन मुरलीधर लांडगे, रा.भोसरी, पुणे या खेळाडूची ५३ वी एशियन बॉडी बिल्डींग आणि फिटनेस चॅम्पियनशीम २०१९ हर्बीन चायना येथे दि.२६ ते २९ जुलै २०१९ या दरम्यान होणार आहे.या स्पर्धेत कु.जीवन मुरलीधर लांडगे हयाची निवड झालेली आहे. या अनुषंगाने कु.जीवन मुरलीधर लांडगे यास मनपाच्या क्रीडा धोरणांनुसार र.रु.१,००,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १२/०७/२०१९

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव -

कु.राजेश सुरेश इरले, रा.पिंपळे गुरव, पुणे या खेळाडूची ५३ वी एशियन बॉडी बिल्डींग आणि फिटनेस चॅम्पियनशीम २०१९ हर्बीन चायना येथे दि.२६ ते २९ जुलै २०१९ या दरम्यान होणार आहे.या स्पर्धेत कु.जीवन मुरलीधर लांडगे हयाची निवड झालेली आहे. या अनुषंगाने कु.राजेश सुरेश इरले यास मनपाच्या क्रीडा धोरणांनुसार र.रु.१,००,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १२/०७/२०१९

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२८०/२०१९ दि.०६/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१९ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ४११ ०३३ येथे महापौरचषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१९-२० (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.४,९९,३४०/- (अक्षरी र.रु.चार लाख नव्याण्णव हजार तीनशे चाळीस फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास

मान्यता घेणेस, सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत र.रू.४,२९,३४०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १२/०७/२०१९

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.९ खराळवाडी येथील मनपाची व्यायाम शाळा गिता महिला बचत गट चालविण्यास उत्सुक असून, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मनपामार्फत विविध योजना राबवित असते. त्या अनुषंगाने खराळवाडी येथील मनपाची व्यायाम शाळा गिता महिला बचत गटास चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( तुषार रघुनाथ हिंगे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३२३/२०१९
दिनांक : १२/०७/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.